महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी लिमिटेडचे कामकाज नियोजन विभागाकडून जलसंपदा विभागाकडे वर्ग करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन निर्णय क्र. : संकीर्ण- २०१८/प्र.क्र.१३/का.१४३३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :-०८ जुलै, २०१९

वाचा:-

१) नियोजन विभाग शासन निर्णय क्र. पाविम-२००२/प्र.क्र. ४२/ का.१४६१, दि.२७ सप्टेंबर, २००२.

२) नियोजन विभाग शासन निर्णय क्र .एमपीव्ही २००३/ प्र.क्र. ७८/ का. १४६१, दि. २० जानेवारी, २००४

३) नियोजन विभाग शासन निर्णय क्र .एमपीव्ही २००४/ प्र.क्र. ७/ का. १४६१, दि. ११ मार्च, २००४

४) नियोजन विभाग शासन निर्णय क्र .एमपीव्हीसी २००४/ प्र.क्र. ५६/ का. १४६१, दि.०६ सप्टेंबर,२००४

५) नियोजन विभाग शासन निर्णय क्र .बॉण्ड्स-२००५/प्र.क्र.३९/का.१४६१, दि. २८ जुलै, २००६

प्रस्तावना :-

"महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी लिमिटेड"या "विशेष हेतू वाहन" कंपनीची स्थापना करण्याचा निर्णय मा.मंत्रिमंडळाच्या दि. १० जुलै, २००२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आला. त्या अनुषंगाने पाच पाटबंधारे विकास महामंडळांना निधी उपलब्ध करुन देता यावा यासाठी कर्ज रोख्याद्वारे निधी उभारण्यासाठी पुढील कार्यवाही करणारा प्रशासकीय विभाग नियोजन विभाग राहील, असे निश्चित करण्यात आले होते. त्या अनुषंगाने पाच पाटबंधारे विकास महामंडळांसाठी एकत्रितरीत्या खुल्या बाजारातून कर्ज रोख्यांद्वारे निधी उभारुन व त्याचे मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशानुसार वाटप करण्यासाठी "महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी लिमिटेड" या "विशेष हेतू वाहन" कंपनीची स्थापना नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्र.पाविम-२००२/प्र.क्र. ४२/ का.१४६१, दि.२७ सप्टेंबर, २००२ अन्वये करण्यात आली.

२. “महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी लिमिटेड” या “विशेष हेतू वाहन” कंपनीमार्फत आतापर्यंत चार कर्जरोखे मालिकांद्वारे (मालिका I, II, III, व IV) रु. ७९८.२५ कोटी एवढा निधी उभारण्यात आला असून त्याचे वाटप पाच पाटबंधारे विकास महामंडळांना करण्यात आले आहे. कर्जरोखे व तत्संबंधी सर्व कामकाज “मे.सिकॉम लिमिटेड” या कंपनीमार्फत करण्यात येत आहे.

३. “महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी लिमिटेड” या “विशेष हेतू वाहन” कंपनीमार्फत कर्जरोख्याद्वारे उभारण्यात आलेल्या कर्जाचा लाभ जलसंपदा विभागाचे अधिनस्त कार्यरत असलेल्या पाच पाटबंधारे विकास महामंडळांना होत असल्याने प्रशासकीय विभाग म्हणून जलसंपदा विभागाने या अनुषंगाने राज्यस्तरावर कार्यवहन व समन्वयाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. यास्तव “महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी लिमिटेड” या “विशेष हेतू वाहन” कंपनीचे कामकाज जलसंपदा विभागाकडे वर्ग करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :-

नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्र. पाविम-२००२/प्र.क्र. ४२/ का.१४६१, दि.२७ सप्टेंबर, २००२ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या “महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी लिमिटेड” या “विशेष हेतू वाहन” कंपनीचे संपूर्ण कामकाज (i) वित्त विभाग (ii) सामान्य प्रशासन विभाग (iii) जलसंपदा विभाग या तिन्ही विभागांच्या पूर्व संमतीने व शासन मान्यतेने या शासन निर्णयान्वये जलसंपदा विभागाकडे वर्ग करण्यात येत आहे. या शासन निर्णयाच्या दिनांकापासून “महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी लिमिटेड” या “विशेष हेतू वाहन” कंपनीशी संबंधित सर्व "प्रशासकीय व वित्तीय (Administrative & Financial)” स्वरुपाचे कामकाज तसेच “कंपनी अधिनियम, २०१३” व केंद्र व राज्य शासनाचे अधिनियम/नियम याखाली सर्व "सांविधिक व विधीबध्द (Statutory & Legal)” जबाबदारी जलसंपदा विभागाकडून हाताळण्यात येईल.

"महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी लिमिटेड" या "विशेष हेतू वाहन" कंपनीमार्फत मालिका क्रमांक IV द्वारे उभारलेल्या कर्ज रोख्यांवरील "मुद्दल, व्याज, हमी शुल्क" वेळेवर प्रदान करण्यासाठी जलसंपदा विभागाने "नवीन लेखाशीर्ष" घेऊन त्याखाली आवश्यक निधी अर्थसंकल्पित करण्याची कार्यवाही तातडीने करावी. सदर नवीन लेखाशीर्ष कार्यान्वित झाल्यावर सध्या कार्यरत असलेले लेखाशीर्ष (५४६५ ००४६) व त्याखालील प्रदाने नियोजन विभागाकडून बंद करण्यात येतील.

महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक क्र. २०१९०७०८१५४४२१४७१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

VIDYA RAMAPPA HAMPAYYA

Digitally signed by VIDYA RAMAPPA HAMPAYYA
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=7b40f543d9d95d4cad6707bb7eae1089289d9878b7cb34418f111566e3223ba1, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a94ef1b631f4673b829ac9adbeb5b0ddabd086a7544e3fdf47cd7a011ff7ea40, ou=PLANNING DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIDYA RAMAPPA HAMPAYYA
Date: 2019.07.08 15:49:39 +05'30'

(विद्या हम्पय्या)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : माहितीस्तव सादर

१) मा. राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

१०) अपर मुख्य सचिव (वित्त)/प्रधान सचिव(व्यय)/ प्रधान सचिव (लेखा व कोषागरे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (पाटबंधारे/लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान महालेखापाल १ व २ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
१३) प्रधान महालेखापाल १ व २ (लेखा परीक्षण),मुंबई/नागपूर.
१४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१५) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१७) प्रबंधक, महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित, द्वारा मे. सिकॉम लि. सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, बिल्डिंग-४, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३
१८) कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ,औरंगाबाद
१९) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव.
२०) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
२१) कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ,ठाणे.
२२) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
२३) सह सचिव (अर्थसंकल्प), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४) अपर संचालक (इ.आ.स.) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, ४ था मजला, मुंबई.
२५) सह सचिव, वित्त विभाग (व्यय-१२), मंत्रालय, मुंबई.
२६) उपसचिव, ऋण व हमी संनियंत्रण कक्ष, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२७) उपसचिव (का.१४२१),नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.
२८) उपसचिव (का.१४२२), (रोख शाखा /२ प्रती), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९) उपसचिव (का.१४२४), (२ प्रती) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०) निवडनस्ती (का.१४३३), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत- तातडीच्या कार्यवाहीकरीता :-

१) अपर मुख्य सचिव (र. व का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव(पाटबंधारे/लाभक्षेत्र विकास),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई.
४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित, मे. सिकॉम लि. सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, बिल्डिंग-४, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३.